# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२६**

**सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**सोमवार, दिनांक १६ मार्च, २०२६**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

**कपात सूचनांची एकूण संख्या – ४**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: डब्ल्यू-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२०२, सर्वसाधारण शिक्षण**<br>**रूपये:- १,१९,७३,६१,०१,०००/-**<br>**श्री. वरुण सरदेसाई** |
| (१) | १४७९ | १०० | सिंधुदुर्ग जिल्हा हा देशातील १०० टक्के साक्षरता जिल्हा असून दहावी व बारावीच्या शालांत परिक्षेतही अव्वलस्थानी आहे. कोकणातील होतकरु विद्यार्थांना शासनाच्या सेवेत येण्याकरिता आवश्यक असलेल्या यूपीएससी व एमपीएससी तसेच इतर स्पर्धा परिक्षेचे दर्जेदार मार्गदर्शन व प्रशिक्षण सुविधा उपलब्ध नसल्याने विद्यार्थांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. याकरिता रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये यूपीएससी, एमपीएससी तसेच इतर राज्य व केंद्रीय स्पर्धा परिक्षांसाठी सक्षम मार्गदर्शन व प्रशिक्षण केंद्रे स्थापन करण्याची आवश्यकता असून या केंद्रामध्ये तज्ञ मार्गदर्शक, ग्रंथालय, डिलिटल अभ्यासिका, स्पर्धा परिक्षा संदर्भातील अद्ययावत अभ्यास साहित्य, टेस्ट सिरीज आणि ऑनलाईन शिक्षण सुविधा उपलब्ध करुन देण्याची नितांत गरज, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२) | १४८० | १०० | मुंबई विद्यापीठाचे कार्यक्षेत्र पालघर ते सिंधुदुर्ग या विस्तृत भौगोलिक परिसरात नसल्याने विद्यार्थांना प्रशासकीय , शैक्षणिक आणि परिक्षा संबधित सेवा सुलभपणे उपलब्ध व्हाव्या याकरिता मुंबई व्यतिरिक्त कल्याण, ठाणे, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग येथे विद्यापीठाची उपकेंद्रे स्थापन करण्यात आलेली आहेत. परंतु अनेक उपकेंद्राना मूलभूत पायाभूत सुविधांचा अभाव असणे, शैक्षणिक सुविधा अपुऱ्या असणे (प्रयोगशाळा, ग्रंथालये, अभ्यासिका आणि संशोधनासाठी आवश्यक साधनसामुग्री) शिक्ष व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी असणे, परिणामी शैक्षणिक गुणवत्तेवर आणि सेवांवर प्रतिकूल परिणाम होत आहे. याकरिता शासनाने या उपकेंद्राना विशेष आर्थिक तरतूद करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: डब्ल्यू-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२०३, तंत्र शिक्षण**<br>**रूपये:- २६,५५,५४,८९,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (३) | १४९२ | १० | मुंबई उपनगरातील कांदिवली येथील ठाकूर विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या प्रशासनाने दि. ७ जानेवारी, २०२६ रोजी स्वतंत्र परिपत्रक काढून ओळखपत्राची नक्कल प्रत (डुप्लीकेट आयडेंटी कार्ड) उपलब्ध करुन देण्यासाठी प्रत्यक्षात मुंबई विद्यापीठाच्या सन २०१८ च्या परिपत्रकानुसार निर्धारित रुपये ५० ऐवजी १ हजार इतके शुल्क आकारले असणे, यासंदर्भात एका विद्यार्थी संघटनेने मुंबई विद्यापीठास तक्रार करणे, या तक्रारीवर सदर महाविद्यालयाकडून लेखी खुलासा मागविण्यापलिकडे कोणतीही कारवाई न करणे, शासनाने याबाबत स्वतंत्र चौकशी करणे आवश्यक असतानाही ती न करणे, ही चौकशी होऊन या महाविद्यालयावर कार्यवाही करण्याची आवश्यकता, परंतु कारवाईस शासनाकडून होत असलेला विलंब, परिणामी येथील विद्यार्थ्यांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४) | १५०२ | १० | भुसावळ (जि. जळगाव) तालुक्यातील पी. के. कोटेचा महिला महाविद्यालयामध्ये गेल्या दहा ते बारा वर्षांच्या कालावधीत विद्यार्थिनींकडून उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने प्रस्तावित व मंजूर केलेल्या शुल्कापेक्षा अधिक शुल्क आकारण्यात येत असणे, तसेच विद्यापीठाची पूर्वमंजुरी नसताना पॉवर चार्जेस, कॉम्प्युटर लंब शुल्क व इतर उपक्रम शुल्क विद्यार्थिनीकडून आकारण्यात येत असणे, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने संबंधित महाविद्यालयास जादा आकारण्यात आलेली शुल्क तसेच दंडाची रक्कम त्वरित विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण निधीत जमा करण्याचे आदेश दिले असणे, प्रस्तुत प्रकरणी विद्यापीठाने समितीने जमा झालेल्या अधिक शुल्क सुमारे रुपये 21 लाख दहा हजार (रु. २१,१०,०००/-) व रकमेच्या १०% टक्के दंड रु. २,१०,०००/- रक्कम "विद्यार्थी विकास निधीच्या" खात्यात जमा केली नसणे, परिणामी येथील विद्यार्थ्यांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

---

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १३ मार्च, २०२६**

**डॉ. विलास आठवले,**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई